## संदर्भ सूची


१. पाटील, दि.हे., राणे, रा.शं. : मराठी : अध्यापन व अध्ययन, [पुणे,: सुविचार प्रकाशन मंडळ], १९८९, पृ. २

२. अकोलकर, ग.वि., पाटणकर, ना.वि. : मराठीचे अध्यापन, [पुणे : व्हीनस प्रकाशन] १९६१, पृ. ४

३. कुंडले, म.बा. : मराठीचे अध्यापन, [पुणे : श्री विद्या प्रकाशन] तिसरी आवृत्ती, १९९१, पृ. ५०

४. करंदीकर, सुरेश : मराठी अध्यापन पध्दती, [कोल्हापूर : फडके प्रकाशन], प्रथमावृत्ती, सप्टेम्बर-१९९६

# प्रकरण तीन

# इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या अध्ययन-विषयक समस्या


३.१ प्रस्तावना

३.२ मराठीचे अध्ययन करताना येणा-या अडचणी

३.३ विद्यार्थ्यांना मराठीच्या अध्यापनात जाणविणा-या त्रुटी

३.४ विद्यार्थ्यांनी अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे यासंबंधी केलेल्या सूचना

- ३.४.अ मराठी विषयाचे शिक्षक
- ३.४.ब मराठी विषयाचा अभ्यासक्रम
- ३.४.क मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक
- ३.४.ड मराठी विषयासंदर्भातील उपक्रम
- ३.४.इ ग्रंथालय
- ३.४.फ वर्गातील वातावरण
- ३.४.ग शिक्षक-विद्यार्थी- विद्यार्थी संबंध
- ३.४.ह अवांतर वाचन-लेखन

३.५ मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन आणि अभ्यासपूरक कार्यक्रम

३.६ विद्यार्थ्यांना मराठी विषय आवडण्याची व नावडण्याची कारणे

३.७ समारोप

# प्रकरण तीन

## इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या अध्ययन-विषयक समस्या

### ३.१] प्रस्तावना -

प्रकरण क्रमांक दोन मध्ये [ मराठी भाषेचे अध्ययन, अध्यापन ] प्रस्तुत संशोधनास पूरक अशी तात्विक पार्श्वभूमी स्पष्ट केलेली आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणात माध्यमिक स्तरावर मराठी या विषयाच्या अध्ययनासंबंधीच्या समस्यांचा विचार केलेला आहे. या समस्या जाणून घेण्यासाठी संशोधिकेने विद्यार्थ्यांसाठी एक प्रश्नावली तयार केलेली आहे. [पहा परिशिष्ट- "अ"] या प्रश्नावलीची माहिती प्रकरण एक मध्ये दिलेली आहे. प्रश्नावली भरून घेण्याच्या दृष्टीने संशोधिकेने प्रथम प्रत्येक शाळेत जाऊन मुख्याध्यापकांची भेट घेतली व त्यांच्या संमतीनुसार मराठी विषयाच्या अध्यापकांची भेट घेतली आणि विद्यार्थ्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यासाठी वेळ ठरवून घेतली. त्या वेळेनुसार मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या सर्व म्हणजे आठ शाळामधील इयत्ता नववी व दहावीच्या एकूण आठशे त्र्यान्नव विद्यार्थ्यांपैकी दोनशे तेवीस विद्यार्थ्यांना प्रश्नावली दिली. माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या अध्ययनविषयक समस्यांचा अभ्यास करावयाचा असल्याने संशोधिकेने इयत्ता नववी व दहावीचे वर्ग घेतले. प्रत्येक शाळेतील इयत्ता नववी व दहावीच्या एकूण विद्यार्थी संख्येच्या २५ % विद्यार्थी यादृच्छिक पध्दतीने निवडले. ही विद्यार्थी संख्या दोनशे तेवीस झाली. या दोनशे तेवीस विद्यार्थ्यांना प्रश्नावली दिली. प्रश्नावली कशी भरावयाची याबाबत विद्यार्थ्यांना सूचना दिल्या. प्रश्नावली भरून देणा-या विद्यार्थ्यांची नावे परिशिष्ट- "क" मध्ये दिलेली आहेत. प्रस्तुत प्रकरणात विद्यार्थ्यांनी भरून दिलेल्या प्रश्नावल्यांचे विश्लेषण करून अन्वयार्थ

लावलेला आहे.

३.२] <u>मराठीचे अध्ययन करताना येणा-या अडचणी</u> :-

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावर मराठीचे द्वितीय भाषा म्हणून अध्ययन करताना कोणकोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक एक ची सोय केली होती. हा प्रश्न बंदिस्त आणि मुक्त अशा संमिश्र स्वरूपाचा होता. या प्रश्नाच्या पूर्वार्धात मराठी विषयाच्या अध्ययन विषयक पंचवीस अडचणी दिलेल्या होत्या. त्यापैकी मराठी विषयाचे अध्ययन करताना येणा-या अडचणींच्या पुढे ती अडचण येत असल्यास 'होय' हा पर्याय ठेवावयाचा आणि अडचण येत नसल्यास 'नाही' हा पर्याय ठेवावयाचा होता. मराठी विषयाचे अध्ययन करताना प्रश्न क्रमांक १ च्या पूर्वार्धात दिलेल्या अडचणींव्यतिरिक्त आणखी कांही अडचणी येत असल्यास त्या प्रश्नाच्या उत्तरार्धात नमूद करण्याविषयी सुचविले होते.

प्रस्तुत प्रश्न क्रमांक १ ला विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ३.१ मध्ये वर्गीकरण केलेले आहे.

<u>सारणी क्रमांक - ३.१</u>

<u>द्वितीय भाषा म्हणून मराठी विषयाचे अध्ययन करताना येणा-या अडचणी</u>

| अ. क्र. | मराठीचे अध्ययन करताना येणा-या अडचणी | होय | नाही | अनिश्चित | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी मातृभाषा नसल्याने आकलन होत नाही. | ४६ | १७४ | ३ | २०.६ |
| २ | मराठीतील काही शब्दांचे उच्चार समजत नाहीत. | ८४ | १३८ | १ | ३७.६ |
| ३ | मराठीतील काही शब्दांचे अर्थ समजत नाहीत. | १४५ | ७७ | १ | ६५.० |

सारणी क्रमांक ३.१]-

| अ. क्र. | मराठीचे अध्ययन करताना येणा-या अडचणी | होय | नाही | अनिश्चित | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| ४ | मराठी-इंग्रजी शब्दकोशाचा उपयोग करता येत नाही. | ११८ | ९९ | ६ | ५२.९ |
| ५ | शब्दकोश शाळेत उपलब्ध होत नाहीत | १५० | ६७ | ६ | ६७.२ |
| ६ | संदर्भ ग्रंथ सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. | १४३ | ७५ | ५ | ६४.१ |
| ७ | मराठी शब्दांना इंग्रजी प्रतिशब्द दिले जात नाहीत. | १४४ | ७६ | ३ | ६४.५ |
| ८ | मराठी विषयाच्या अभ्यासासाठी स्वतंत्र सोय नाही. | ११५ | १०१ | ७ | ५१.५ |
| ९ | मराठीच्या तासाला शिक्षक-विद्यार्थी यांच्यामध्ये मराठीतून संभाषण होत नाही. | ५९ | १६२ | २ | २६.४ |
| १० | मराठी विषयासाठी पालकांकडून मार्गदर्शन होत नाही. | ६७ | १५० | ६ | ३०.० |
| ११ | शिक्षकांकडून विचारलेल्या शंकाचे निरसन होत नाही. | ५३ | १६६ | ४ | २३.७ |
| १२ | शिक्षकांनी शिकविलेल्या गद्य विभागातील आशय समजत नाही. | ६१ | १५५ | ७ | २७.३ |
| १३ | शिक्षकांनी शिकविलेल्या पद्य विभागातील आशय समजत नाही. | ६७ | १४९ | ७ | ३०.० |
| १४ | शिक्षकांनी शिकविलेले व्याकरण समजत नाही. | ६३ | १५५ | ५ | २८.२ |
| १५ | शिक्षकांनी शिकविलेले लेखन विभागातील तंत्र समजत नाही. | ७१ | १४९ | ३ | ३१.८ |
| १६ | शाळेतील वातावरण इंग्रजी माध्यमाचे असल्याने मराठी विषयाच्या अध्ययनास पूरक नाही. | ७४ | १४३ | ६ | ३३.१ |


सारणी क्रमांक ३.१]-

| अ. क्र. | मराठीचे अध्ययन करताना येणा-या अडचणी | होय | नाही | बाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इंग्रजी माध्यम असल्याने मराठी विषयास दुय्यम स्थान दिले जाते. | १५० | ६७ | ६ | ६७.२ |
| १८ | विविध सांस्कृतिक कार्यक्रमामुळे मराठीच्या अध्ययनास वेळ मिळत नाही. | ७९ | १३९ | ५ | ३५.४ |
| १९ | विविध कार्यक्रमामुळे मराठीच्या अध्यापनाकडे दुर्लक्ष होते. | ४६ | १७२ | ५ | २०.६ |
| २० | मराठी विषय आवडत नसल्याने अध्ययन होत नाही. | ५५ | १६२ | ६ | २४.६ |
| २१ | मराठी भाषेमध्ये वाक्यरचना करता येत नाही. | १३१ | ८७ | ५ | ५८.७ |
| २२ | इंग्रजी व्याकरणाच्या प्रभावामुळे मराठी भाषेच्या व्याकरणाच्या अध्ययनात चुका होतात. | १२० | ९८ | ५ | ५३.८ |
| २३ | मराठी भाषेचे वाचन व लेखन करताना जोडाक्षरे व वाक्यप्रचार अवघड वाटतात. | ९८ | ११९ | ६ | ४३.९ |
| २४ | मराठी भाषेमध्ये लेखन करताना जोडाक्षरे व वाक्प्रचार अवघड वाटतात | १५३ | ६३ | ७ | ६८.६ |
| २५ | शाळेव्यतिरिक्त इतरत्र मराठी भाषेचा वापर करताना अडचण येते. | ४७ | १६९ | ७ | २१.० |


वरील सारणी क्रमांक ३.१ वरून असे म्हणता येईल की, प्रश्न क्रमांक एक मध्ये दिलेल्या अडचणींपैकी अडचण क्रमांक ३, ४, ५, ६, ७, ८, १७, २१, २२, २४ या प्रमुख अडचणी आहेत. कारण या अडचणी आहेत असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या या अडचणी नाहीत असे म्हणणा-या संख्येपेक्षा अधिक आहे.

आलेख ३.१

द्वितीय भाषा म्हणून मराठी विषयाचे अध्ययन करताना येणाऱ्या अडचणी



आलेख ३.१


द्वितीय भाषा म्हणून मराठी विषयाचे अध्ययन करताना येणाऱ्या अडचणी
(पान-२)
य अक्ष
होय
नाही
प्रमाण:-
क्ष अक्ष - अडचणी क्रमांक
य अक्ष - विद्यार्थी संख्या
२००
१९०
१८०
१७०
१६०
१५०
१४०
१३०
१२०
११०
१००
९०
८०
७०
६०
५०
४०
३०
२०
१०
0
१६
१७
१८
१९
२०
२१
२२
२३
२४
२५
क्ष अक्ष

अडचण क्रमांक ३ मराठीतील कांही शब्दांचे अर्थ समजत नाहीत अशी आहे. ही अडचण आहे म्हणणा-यांची संख्या शेकडा ६५ % आहे. याबाबत असे म्हणता येईल की, मराठीतील कांही अनाकलनीय शब्दांचे अर्थ स्पष्ट करताना इंग्रजी अगर हिंदी प्रतिशब्द द्यावेत व शब्दांचे अर्थ शोधण्यासाठी शब्दकोशांचा वापर करण्यासाठी मार्गदर्शन करावे म्हणजे अडचण क्रमांक ४ मराठी-इंग्रजी शब्दकोशाचा उपयोग करता येत नाही यावरही मात करता येईल कारण ही अडचण असणा-यांची संख्या शेकडा ५२.९ आहे. वरील दोन्ही अडचणींचे निराकरण करण्यासाठी शाळेत शब्दकोश, संदर्भ ग्रंथ, उपलब्ध असले पाहिजेत. यासाठी अडचण क्रमांक ६, ७, ८ संदर्भातही शाळेचे ग्रंथालय समृध्द असले पाहिजे. १९६७ साली संमत झालेल्या ग्रंथालय कायद्यानुसार गाव तेथे ग्रंथालय असावे असे शासनाला जाणवले, त्यानुसारच शाळा तेथे ग्रंथालय व पूर्ण वेळ ग्रंथपाल याची गरज शासनाच्या लक्षात यावयास हवी आहे. यासाठी शाळांना उत्तम ग्रंथालय ठेवण्याकरता विशेष ग्रंथ अनुदानाची जादा रकमेची सोय व प्रशिक्षित पूर्ण वेळ ग्रंथपालाची नेमणूक केल्यास फार मोठी शैक्षणिक सुधारणा होईल.

अडचण क्रमांक १७ असणा-या विद्यार्थ्यांची संख्या शेकडा ६७.२ इतकी आहे. म्हणजे इंग्रजी माध्यमाच्या शाळामध्ये मराठी भाषेस दुय्यम स्थान दिले जाते. वास्तविक पाहता महाराष्ट्र राज्यात मराठी भाषेस प्रथम स्थान असले तरी मात्र ती इंग्रजीच्या आकर्षणामुळे मागे पडली आहे. तिच्याकडे पाहण्याचा मराठी भाषिकांचाच दृष्टीकोन संकुचीत असलेला दिसून येतो, मात्र हे बदलण्याची गरज आहे. म्हणजे भाषेच्या उद्दिष्टामध्ये नमूद केलेल्या भाषेचा अभिमान, अभिरुची वाढविणे या उद्दिष्टांवर भर देणे आवश्यक आहे. म्हणजेच मराठी भाषेत बोलणे, वाक्यरचना करणे, जोडाक्षरे, वाक्प्रचारांचा वापर करणे इत्यादी बाबी सुलभ होतील म्हणजे अडचण क्रमांक २१, २२, २४ सुध्दा सोडविणे सहजशक्य होईल.

वर नमूद केलेल्या अडचणींशिवाय इतर अडचणी नाहीत असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या त्या अडचणी आहेत असे म्हणणा-या विद्यार्थ्यांच्या संख्ये-

पेक्षा अधिक आहे.

या प्रश्नाच्या उत्तरार्धात आणखी अडचणी असल्यास नमूद कराव्यात असे सुचविले होते. या मुक्त प्रश्नास काही विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला आहे. त्यानुसार पुढील अडचणींची नोंद करता येईल.

१. व्याकरण अध्यापन शेवटी केले जाते.
२. संदर्भ पुस्तके वेळेत उपलब्ध होत नाहीत.
३. व्याकरणासाठी स्वतंत्र तासिका नाहीत.
४. शुध्दलेखनाकडे फारसे लक्ष दिले जात नाही.
५. लेखन विभागातील निबंध, पत्र यामध्ये वाक्यरचनेत अडचणी येतात.
६. ऱ्हस्व दीर्घ वेलांटी व उकार समजत नाहीत.
७. वाचन-लेखनात गती येत नाही.
८. पाठ्यपुस्तकातील उतारे केवळ माहितीपूर्ण वाटतात.
९. घरी व शाळेत भाषा वेगळी असते.
१०. केवळ परीक्षेपूर्वीच व्याकरण अध्यापन होते.
११. ग्रंथालयाची स्वतंत्र सोय नाही.

वरील सर्व अडचणींचे निराकरण करण्यासाठी शासन, संस्था-चालक, मुख्याध्यापक, विषय-शिक्षक यांनी एकत्र येऊन विचारविनीमय करुन विद्यार्थ्यांच्या साठी स्वतंत्र ग्रंथालय, वाचनकक्ष, अभ्यासिका याची सोय करता येईल. व्याकरण अध्यापनासाठी वेळापत्रकात स्वतंत्र तासिका दाखविल्यास नियमितपणे अध्यापन केले जाईल व विद्यार्थ्यांच्या अध्ययनविषयक अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करावा असे संशोधिकेस सुचवावेसे वाटते.

### ३.३] <u>विद्यार्थ्यांना मराठीच्या अध्यापनात जाणविणाऱ्या त्रुटी</u> :-

मराठीचे **अध्ययन** करताना इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठीच्या अध्यापनात कोणत्या त्रुटी आढळतात हे समजून घेण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक दोनची योजना केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त व

मुक्त अशा स्वरूपाचा होता. या प्रश्नाच्या पूर्वार्धात अध्यापनात जाणविणा-या दहा त्रुटींचा समावेश केलेला होता. त्यापैकी विद्यार्थ्यांना मराठीच्या अध्यापनात आढळणा-या त्रुटींच्यापुढे 'होय' किंवा 'नाही' यापैकी योग्य पर्याय ठेवावा व नको असलेल्या पर्यायावर फुली मारावी असे सुचविलेले होते आणि प्रश्नाच्या उत्तरार्धात पूर्वार्धातील त्रुटीव्यतिरिक्त आढळणा-या त्रुटी नमूद करण्याविषयी सूचविले होते.

प्रस्तुत प्रश्नास विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ३.२ मध्ये केलेले आहे.

<u>सारणी क्रमांक ३.२</u>

<u>मराठीच्या अध्यापनात आढळणा-या त्रुटी</u>

| अ. क्र. | मराठीच्या अध्यापनात आढळणा-या त्रुटी | होय | नाही | बाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षकाचे अध्यापन रूचीहिन वाटते. | ४८ | १७० | ५ | २१.२ |
| २ | पाठ्यपुस्तकातील उतारे क्लिष्ट व किचकट आहेत. | १०५ | ११४ | ४ | ४७.४ |
| ३ | मराठीच्या अभ्यासात आशयाच्या दृष्टीने तुटकपणा जाणवतो. | ९० | १२८ | ५ | ४०.३ |
| ४ | उच्चारानुसार शुध्दलेखन होत नाही | ११७ | १०४ | २ | ५२.४ |
| ५ | मराठीच्या तासाला मराठीतून संभाषण होत नाही. | २७ | १९४ | २ | १२.१० |
| ६ | मराठीचे अध्यापन इंग्रजी माध्यमातून केले जाते | ३५ | १८२ | ६ | १५.६ |
| ७ | शिक्षकांची मराठी भाषा खूप उच्च प्रतीची वाटते. | ५५ | १६३ | ५ | २४.६ |
| ८ | शिक्षक पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अवांतर कांही शिकवित नाहीत. | ८० | १३८ | ५ | ३५.८ |

सारणी क्रमांक ३.२]-

| अ. क्र. | मराठीच्या अध्यापनात आढळणाऱ्या त्रुटी | होय | नाही | बाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| ९ | शब्दकोश व संदर्भग्रंथ वापरण्याविषयी शिक्षकांकडून मार्गदर्शन मिळत नाही. | ७७ | १४१ | ५ | ३४.५ |
| १० | अध्यापनाचे वेळी वाचन व लेखन यावर भर दिला जात नाही. | ६५ | १५३ | ५ | २९.१ |

वरील सारणी क्रमांक ३.२ वरून असे दिसून येते की, -


१] उच्चारानुसारी शुध्दलेखन होत नाही ही अध्यापनातील त्रुटी ५२.४% विद्यार्थ्यांना जाणवली आहे. कारण ही अनुक्रमांक ४ वर असणारी त्रुटी आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही त्रुटी नाही असे म्हणणाऱ्या विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त आहे.

२] ४७.४ % विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील उतारे क्लिष्ट व किचकट वाटतात. यासाठी शिक्षकांनी असे उतारे सोप्या पध्दतीने विद्यार्थ्यांना आकलन होईल अशाप्रकारे स्पष्ट करून शिकविले पाहिजेत.

३] अनुक्रमांक ३ ही त्रुटी ४०.३ % विद्यार्थ्यांना आहे असे वाटते. म्हणजे पाठ्यपुस्तकातील उताऱ्यामध्ये तुटकपणा जाणवतो. वास्तविक पाहता असे तुटक उतारे असणारच. संपूर्ण नाटक अथवा कादंबरी घेता येणार नाही, मात्र अशा उताऱ्यांच्या परिचयात त्याबाबत विस्ताराने माहिती दिल्यास अडचण येणार नाही. तसेच शिक्षकांनी अशा पाठ्यांशाचे अध्यापन करण्यापूर्वी तो भाग ज्या नाटकातून अथवा कादंबरीतून घेतला आहे त्यासंबंधीचे आवश्यक साहित्य व संदर्भग्रंथ उपलब्ध करून अभ्यासावेत म्हणजे विद्यार्थ्यांचे नुकसान टळेल.

४] अनुक्रमांक ८ व ९ या त्रुटी आहेत असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे ३५.८ % व ३४.५ % इतकी आहे. यावरून शिक्षक पाठ्यांशाव्यतिरिक्त अवांतर काही शिकवित नाहीत व शब्दकोश व संदर्भग्रंथ वापरण्याविषयी

आलेख - ३.२


मराठीच्या अध्यापनात आढळणाऱ्या त्रुटी
य अक्ष
होय
नाही
प्रमाण:-
क्ष अक्ष - त्रुटी क्रमांक
य अक्ष - विद्यार्थी संख्या
०
१
२
३
४
५
६
७
८
९
१०
क्ष अक्ष

मार्गदर्शन करत नाहीत या त्रुटी दिसून येतात यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी अवांतर विषयाचे मराठीतून निवेदन, वाचन व लेखन यावरही भर द्यावा, व आकलन होण्यासाठी शब्दकोश व संदर्भग्रंथ वापरण्याचे मार्गदर्शनही करावे.

या शिवाय इतर राहिलेल्या त्रुटी नाहीत असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्रुटी आहेत असे म्हणणाऱ्यांपेक्षा जास्त आहे.

या प्रश्नाच्या उत्तरार्धात, पूर्वार्धात असलेल्या त्रुटी व्यतिरिक्त त्रुटी जाणवत असल्यास लिहाव्यात असे सुचविले होते त्यानुसार कांही विद्यार्थ्यांनी सुचविलेल्या त्रुटी पुढीलप्रमाणे आहेत.

१. शिक्षकाकडून विद्यार्थ्यांच्या वाचनाकडे लक्ष पुरविले जात नाही.

२. शिक्षकाकडून पाठ्यांशाबाबत चर्चा केली जात नाही.

३. शिक्षकांना मराठी विषयाचे तास कमी दिले जातात, त्यामुळे अध्यापन कमी होते.

४. अध्यापनाचे वेळी वैयक्तिक लक्ष दिले जात नाही कारण विद्यार्थी संख्या जास्त आहे.

५. उजळणी घेतली जात नाही.

६. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अध्यापन केले जात नाही.

७. हस्ताक्षर सुधारण्याचे प्रयत्न केले जात नाहीत.

८. व्याकरण अध्यापनाकडे दुर्लक्ष केले जाते.

९. पाठ्यपुस्तकातील उतारे मनोरंजक नसल्याने अध्यापन मनोरंजक वाटत नाही.

१०. अपरिचित व कठीण शब्दांचे उच्चार व अर्थ यांची उजळणी होत नाही.

११. लेखनावर भर दिला जात नाही.

१२. व्याकरणाचे अध्यापन शेवटी परीक्षा आल्यावर केले जाते.

१३. शब्दकोशासंबंधी मार्गदर्शन केले जात नाही.

१४. अध्यापनाचे वेळी तोंडी लेखन फलकावर लिहिले जात नाही.

१५. शिक्षकांची मातृभाषा मराठी नसल्याने अध्यापन व अध्ययन सुलभ होत नाही.

*वरील विद्यार्थ्यांनी प्रश्न क्रमांक दोनच्या उत्तरार्धात केलेल्या मुक्त प्रतिसादानुसार अध्यापनात अनुभवास येणाऱ्या त्रुटी आहेत. या दूर करण्यासाठी शिक्षकांनी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे व आपले अध्यापन मनोरंजक व प्रभावी केले पाहिजे.

३.४] <u>विद्यार्थ्यांनी अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे यासंबंधी केलेल्या सूचना</u> -

विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीमधील तिसऱ्या प्रश्नात मराठीच्या अध्ययन-अध्यापनाशी निगडीत असलेल्या कांही बाबी दिलेल्या होत्या. मराठीचे अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे या हेतूने या विशेष बाबींच्या संदर्भात सूचना कराव्यात असे सांगितले होते. विद्यार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

३.४.अ] <u>मराठी विषयाचे शिक्षक</u> -

मराठीच्या अध्ययन अध्यापनाशी निगडीत असलेल्या बाबीमध्ये सर्वप्रथम "मराठी विषयाचे शिक्षक" ही बाब दिली होती. विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे अध्ययन व अध्यापन प्रभावी व्हावे म्हणून मराठी विषयाच्या शिक्षकांविषयी सूचना करावयास सांगितल्या होत्या. विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना व मराठी विषयाच्या शिक्षकासंबंधी त्यांच्या अपेक्षा त्यांनी प्रतिसादाच्या स्वरूपात व्यक्त केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे -

१. मराठी विषयाचे शिक्षक मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेले व योग्य शैक्षणिक पात्रता धारण करणारे असावेत, म्हणजे पदवी व पदव्युत्तर परीक्षेस त्यांचा मराठी विषय असावा.

२. मराठी विषयशिक्षकाकडे मराठी भाषेचे ज्ञान भरपूर असावे.

३. इंग्रजी माध्यमांच्या शाळा असल्या तरीसुध्दा मराठी विषयाच्या शिक्षकांनी शिकविताना मराठी भाषाच वापरावी.

४. अमराठी भाषिक विद्यार्थ्यांचा विचार करून मराठीच्या शिक्षकांनी सोप्या भाषेत अध्यापन करावे. उच्च भाषेचा वापर कमी करावा.

५. शिक्षकांनी मराठी भाषेविषयी गोडी निर्माण करून, गोष्टीरूप समजेल अशा भाषेत अध्यापन करावे. वाक्यरचना सोपी व सुटसुटीत असावी.

६. पाठ्यपुस्तकाशिवाय इतर अवांतर माहिती मराठीतून सांगावी.

७. शिक्षकांचे उच्चार व फलकलेखन शुध्द व स्पष्ट असावे.

८. विद्यार्थ्यांच्या समस्या लक्षात घेऊन मार्गदर्शन करावे.

९. सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व शंका [भाषा विषयक] निरसन कराव्यात.

१०. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाचा शिक्षक इंग्रजीचे ज्ञान असणारा असावा.

११. मराठीचे अध्यापन मनोरंजकतेने करावे. अधूनमधून विनोदाची पेरणी करावी.

१२. मराठीचा शिक्षक प्रेमळ, समंजस, विद्यार्थ्यांबद्दल आपुलकी व जिव्हाळा निर्माण करणारा असावा.

१३. मराठीचा शिक्षक भाषेच्यादृष्टीने परिपूर्ण असावा.

१४. अध्यापन करताना पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे, व्याकरणे, लेखन याविषयी उदाहरणासह मार्गदर्शन करावे.

१५. शिक्षकामध्ये शिक्षा करण्याची प्रवृत्ती नसावी.

१६. वाचन, लेखन व व्याकरण यावर भर द्यावा, त्यासाठी जादा तास द्यावेत. अभ्यासक्रम पूर्ण करावा.

१७. विद्यार्थ्यांच्या शुध्दलेखन व हस्ताक्षर याकडे लक्ष द्यावे.

१८. पाठ्यांशाशी संबंधीत असे पाठ्यपुस्तकाशिवाय इतर अवांतर वाचनासाठी संदर्भ व पुस्तके यांची माहिती शिक्षकांनी द्यावी.

१९. मराठीच्या तासाला सर्व संभाषण मराठीतूनच व्हावे.

२०. मराठीतील व्याकरणाचा भाग सुरूवातीपासूनच घ्यावा. परीक्षा जवळ आल्यावर घाई गडबडीत शिकवू नये.

२१. शिक्षकांनी केवळ गृहपाठांची संख्या न वाढविता जे गृहपाठ घेतले

त्यांची तपासणी करुन योग्यवेळी दुरुस्ती करुन घ्यावी.

वरील सर्व सूचना विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादातून शक्यतो पुनरावृत्ती टाळण्याचा प्रयत्न करुन मांडल्या आहेत. या सूचनांचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी त्याच्या स्वभावाविषयी, अध्यापनाविषयी, अभ्यासक्रमाविषयी, स्पष्टीकरणाविषयी, व्याकरण अध्यापना विषयी, मराठी-इंग्रजीच्या विषयज्ञानाविषयी सूचना मांडलेल्या आहेत.

या विद्यार्थ्यांनी केलेल्या काही सूचना चांगल्या व स्वागतार्ह आहेत. उदा. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयशिक्षकाला इंग्रजीचेही ज्ञान असावे. कारण अमराठी विद्यार्थ्यांनी काही पाठयांशाच्याबाबतीत इंग्रजी भाषेतून स्पष्टीकरण करणे गरजेचे व आवश्यक आहे.

शिक्षकांनी पाठयांशाचे स्पष्टीकरण करताना सोप्या व समजेल अशा भाषेत योग्य वाक्यरचना करुन, स्पष्ट व शुध्द उच्चारातून तसेच फलकलेखनही शुध्द, स्पष्ट व सुवाच्च अक्षरात असावे.

व्याकरण अध्यापनावर भर द्यावा व ते सुरवातीपासून शिकवावे अशी सूचना केली तीही रास्त आहे. कारण इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून द्वितीय भाषा म्हणून शिकविल्या जाणा-या मराठीच्या अध्यापनाकडे त्यातूनही व्याकरण अध्यापनाकडे दुर्लक्ष होते. अगदी परीक्षा जवळ आल्यावर १ – २ दिवसात व्याकरण अध्यापन केले जाते हे चुकीचे आहे. त्यामुळे अमराठी विद्यार्थ्यांना आकलन होत नाही व मराठी भाषेबद्दल अरुची निर्माण होते म्हणून व्याकरण अध्यापन हे सुरुवातीपासूनच करावे व शिक्षकाने कार्यात्मक व्याकरणावर भर द्यावा.

शिक्षकांनी मराठीच्या तासाला मराठी भाषा वापरावी, मराठीतून संभाषण करावे ही सूचनाही चांगली आहे. अमराठी विद्यार्थ्यांना मराठी या प्रादेशिक भाषेबद्दल माहिती, गोडी निर्माण होणे यामुळेच शक्य होईल व नेहमी दैनंदिन व्यवहार करताना शाळेबाहेरही त्यांना मराठी भाषेचा वापर करता येईल.

शिक्षकांनी शिक्षा करू नये अगर रजा घेऊ नये या सूचना मात्र अयोग्य वाटतात. कारण विद्यार्थ्यांना योग्य मार्ग दाखविण्यासाठी व चांगले संस्कार करण्यासाठी, चांगल्या अभ्याससवयी लागण्यासाठी शिक्षकांना शिक्षेचाही वापर करावा लागतो. मात्र याचा अतिरेक होऊन विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता मात्र शिक्षकांनी घेणे गरजेचे आहे.

शिक्षक हा माणूसच आहे, त्यालाही कांही अडचणी, आजारपण आहेच या कारणासाठी त्याला रजेची आवश्यकता आहे. त्यावेळी त्यांनी जरूर रजा घ्यावी मात्र त्याच्या रजेच्या मुदतीतील सर्व अभ्यासक्रम पूर्ण कसा होईल याकडे स्वत: शाळा प्रमुखाने लक्ष द्यावे म्हणजे रजेमुळे होणारे विद्यार्थ्यांचे नुकसान टाळता येईल.

३.४.ब] <u>मराठी विषयाचा अभ्यासक्रम</u> -

अध्ययन अध्यापनाशी संबंधित असलेली दुसरी बाब म्हणजे मराठी विषयाचा अभ्यासक्रम अशी होती. मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे या हेतूने मराठी विषयाचा अभ्यासक्रम या संदर्भात सूचना कराव्यात असे सांगितले होते. त्यानुसार विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. सर्व सामान्य अमराठी विद्यार्थ्यांना समजेल असा अभ्यासक्रम असावा.

२. सध्याचा अभ्यासक्रम सोपा आहे.

३. अभ्यासक्रमातील पाठ लहान व वाचनीय असावेत.

४. शिक्षकांनी अभ्यासक्रमाची बौध्दिक बाजू विचारात घ्यावी.

५. अभ्यासक्रमामध्ये इतर संदर्भ वाचनासाठी दिलेले असावेत.

६. अभ्यासक्रम किचकट रूचीहीन नसावा.

७. भाषेचा अभिमान व गोडी वाढविणारा असावा.

८. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेनुसार अभ्यासक्रमाची रचना असावी.

९. अभ्यासक्रमातील पद्य विभाग सोपा असावा.

१०. अभ्यासक्रमात सामाजिक विषयासंबंधी पाठ असावेत.

११. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करणारा अभ्यासक्रम असावा.

१२. अभ्यासक्रमात व्याकरणाचा भाग कमी असावा.

१३. अभ्यासक्रमात सारांशलेखन, पत्रलेखन, निबंधलेखन यासंबंधी मार्गदर्शन असावे.

१४. अपरिचित शब्दांचे अर्थ व संदर्भ दिलेले असावेत. सध्याच्या अभ्यासक्रमात दिलेले आहेत, परंतु ते अपुरे वाटतात यापेक्षा अधिक द्यावेत.

१५. उच्च शिक्षणास उपयोगी होईल असा अभ्यासक्रम असावा.

१६. अभ्यासक्रमामध्ये प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व एखादा नमुना दिलेला असावा.

विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना शक्यतो पुनरावृत्ती टाळून एकत्र केलेल्या आहेत. यामध्ये अभ्यासक्रम रचनेबाबत, गद्य, पद्य, व्याकरण या उपघटकाबाबत, बौध्दिक क्षमतेनुसार, अभ्यासक्रमात अंतर्भूत करावयाच्या इतर बाबी याविषयी सूचना केलेल्या दिसून येतात. वरील सूचनांचा विचार केला असता विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमविषयक नोंदविलेली मते विचारात घेण्यायोग्य वाटतात. म्हणून येथे अशी एक शिफारस करावीशी वाटते की, ज्यावेळी अभ्यासक्रम तयार केला जातो त्यावेळी तो ज्यांच्यासाठी राबवायचा त्या विद्यार्थ्यांची मते अवश्य विचारात घेण्यात यावीत.

द्वितीय भाषा म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीची उद्दिष्टे गौण स्तरावरील किंवा प्राथमिक स्तरावर असल्याने व्याकरणाचा भाग कमी असावा ही सूचना विचारात घेण्यासारखी आहे. विद्यार्थ्यांना भाषा शिकवावयाची आहे, व्याकरण नाही म्हणून पाठ्यांशाशी निगडीत असणारे कार्यात्मक स्वरूपाचे व्याकरण अभ्यासक्रमात असावे.

३.४.क] <u>मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी द्वितीय भाषा म्हणून शिकविली जाते, त्याची उद्दिष्टे व अभ्यासक्रम विचारात घेऊन पाठ्यपुस्तकाबाबत विद्यार्थ्यांच्या सूचना असल्यास नोंदविण्यास सांगितले होते. त्यानुसार विद्यार्थी वर्गातून पाठ्यपुस्तकासंबंधी आलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत. -

१. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांची संख्या आहे त्यापेक्षा कमी असावी.
२. पाठ्यपुस्तकातील उतारे मोठ्या अक्षरात मुद्रित केलेले असावेत.
३. पाठ्यपुस्तक सोपे व समजण्यास सुलभ असावे.
४. पाठ्यपुस्तकात विनोदी साहित्याचे प्रमाण जास्त असावे.
५. पाठ्यपुस्तकातील उतारे मनोरंजक, माहितीप्रधान व व्यवहारोपयोगी असावेत.
६. पाठ्यपुस्तकात ऐतिहासिक उतारे असावेत, गोष्टी असाव्यात.
७. पाठ्यपुस्तकात व्याकरणाचा स्वतंत्र भाग असावा.
८. पुस्तकाची छपाई व बांधणी सुबक असावी.
९. पाठ्यपुस्तकाची किंमत कमी असावी.
१०. बौध्दिक क्षमतेचा विचार करुन व्याकरणाचे पाठ असावेत.
११. संत साहित्याचा समावेश असावा.
१२. प्रत्येक पाठाखाली रिकाम्या जागा, वाक्यात उपयोग, संदर्भ, शब्दार्थ इत्यादी जास्त असावेत.
१३. गद्यखंड, छोटे व सोपे असावेत.
१४. व्याकरण सुलभ पध्दतीने उदाहरणांची संख्या भरपूर देऊन पाठयांशाशी निगडीत पाठ्यपुस्तकात दिलेले असावेत.
१५. प्राचीन व संतसाहित्य नसावे.

वरील सूचनांमध्ये काही सूचना पाठ्यपुस्तकाच्या बाहयांगाविषयी तर काही सूचना अंतर्गत भागाविषयी आहेत. तर सूचना क्रमांक ११ व १५ या परस्परविरोधी सूचनांचाही समावेश झालेला दिसून येतो.

३.४.ड] <u>मराठी विषयासंदर्भातील उपक्रम</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी अभ्यासेतर उपक्रम कसे असावेत, कोणते असावेत या संबंधी विद्यार्थ्यांना प्रश्न क्रमांक ३ मध्ये सूचना करण्यास सांगितले होते. त्यानुसार

विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत. -

१. कथाकथन स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात याव्यात.
२. व्याकरणासाठी जास्त तास द्यावेत.
३. वाद-विवाद स्पर्धा घेण्यात याव्यात.
४. दररोज प्रार्थना झाल्यानंतर मराठी भाषेतून सुविचार व बातम्या सांगाव्यात.
५. पत्रलेखन स्पर्धा द्याव्यात.
६. स्पर्धेत यशस्वी होणा-या विद्यार्थ्यांना पारितोषिके द्यावीत.
७. नाटक, कविता यांचे सामुदायिक वाचन करावे.
८. वाचनावर भर देण्यासाठी संदर्भ पुस्तके द्यावीत.
९. पाठाचे नाट्यीकरण करावे.

मराठीचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना चांगल्या आहेत. त्यांचे योग्य नियोजन व आयोजन झाले तर निश्चितच उपयुक्त होईल. वरील उपक्रमाशिवाय लेखक-कवी यांचा परिचय करुन देण्यासाठी मुलाखती आयोजित करणे, आकाशवाणीवरील शालेय कार्यक्रम ऐकवावेत, चांगल्या वक्त्यांची भाषणे आयोजित करावीत. उच्चार शुध्दतेसाठी कांही ध्वनिमुद्रिका ऐकवाव्यात. इत्यादी उपक्रम घेण्यात यावेत.

अभ्यासेतर उपक्रम नियोजनबध्द पध्दतीने जर घेतले तर भाषा विषयाच्या अध्ययन-अध्यापनास ते पोषकच ठरते. भाषा अध्ययनाची गोडी वाढते म्हणून असे उपक्रम आयोजित करावेत.

३.४.इ] <u>ग्रंथालय</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील द्वितीय भाषा मराठीचे अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे या हेतूने ग्रंथालय या विशेष बाबीच्या संदर्भात सूचना कराव्यात असे विद्यार्थ्यांना सांगितले होते, विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत. -

१. शाळेच्या ग्रंथालयात इंग्रजी माध्यमाची पुस्तके जास्त आहेत, मराठी माध्यमाची पुस्तके कमी आहेत ती वाढवावीत.

२. ग्रंथालयात व्याकरणाची पुस्तके असावीत.

३. शाळेतील ग्रंथालयाप्रमाणे मुलांना स्वत:च्या घरात छोटे ग्रंथालय तयार करण्यास प्रवृत्त करावे.

४. छोटया वर्गातील विद्यार्थ्यांसाठी चित्रात्मक पुस्तके असावीत.

५. पुस्तके वाचण्यासाठी भरपूर मुदत द्यावी.

६. ग्रंथालयात पौराणिक पुस्तके असावीत.

७. ग्रंथालयात मराठी मासिके असावीत.

८. संदर्भ ग्रंथ असावेत व त्यांचा उपयोग व्हावा.

९. रूचीदार, मनोरंजक, व्यंगचित्रांचा सहभाग असणारी पुस्तके असावीत.

१०. वाक्प्रचाराची व सुविचारांची संग्रह असलेली पुस्तके असावीत.

११. ग्रंथालयात जुनी पाठ्यपुस्तके असावीत.

१२. व्यंगचित्रात्मक विनोदी पुस्तके असावीत.

ज्या शाळेमध्ये ग्रंथालय आहे त्यांनी वरीलप्रमाणे सूचना केलेल्या आहेत, परंतु ब-याच विद्यार्थ्यांनी शाळेत ग्रंथालय नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. अर्थात ही समस्या विचारात घेण्यासारखी आहे. गाव तेथे शाळा याप्रमाणे शाळा तेथे ग्रंथालय असले पाहिजे.

ग्रंथालय व्यवस्थापनासाठी स्वतंत्र तज्ञ व्यक्ती ग्रंथपाल म्हणून असणे आवश्यक आहे. ग्रंथालयामध्ये पौराणिक, ऐतिहासिक, संतसाहित्य, जुनी पाठ्यपुस्तके, व्याकरणविषयक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शब्दकोश, ज्ञानकोश यांचा अंतर्भाव असणे गरजेचे आहे. या सर्व साहित्याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळाला पाहिजे. तसेच ग्रंथालयात दररोजची वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, शिक्षणविषयक अंक असावेत.

वरील सर्व सूचना विद्यार्थ्यांच्या आवडीचे निदर्शक असून त्यांच्या प्रगल्भ बुध्दीचे द्योतक आहेत असे वाटते. वाचनालयात पुस्तके आहेत, पण

वाचक विद्यार्थीच नाहीत असा जो एक तक्रारीचा सूर असतो त्याला छेद देणा-या अशा या सूचना आहेत.

३.४.फ ] <u>वर्गातील वातावरण</u> -

अध्ययन-अध्यापन आणि वर्गातील वातावरण यांचा अन्योन्य संबंध लक्षात घेऊन मराठीचे अध्ययन-अध्यापन अधिक प्रभावी व्हावे या हेतूने वर्गातील वातावरण या विशेष बाबीच्या संदर्भात सूचना कराव्यात असे सांगितले होते. विद्यार्थ्यांनी या संदर्भात केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. वर्गातील वातावरण शांत असावे.

२. वर्गातील वातावरण आनंदी व प्रसन्न असावे.

३. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संभाषण मराठीतूनच व्हावे म्हणजे मराठीच्या तासाला पोषक वातावरण निर्माण होईल.

४. मराठीच्या तासाला वर्गातील वातावरण मराठीमय असावे.

५. वर्गातील बैठक व्यवस्था योग्य असावी.

६. मराठी विषयाविषयी गोडी निर्माण करणारे वातावरण असावे.

वरील सूचनांवरून असे वाटते की, विद्यार्थ्यांना वर्गातील वातावरण शांत, आनंदी, मराठी भाषेस पोषक असे असावे. अशा वातावरणामुळे एकाग्रता वाढते. मराठी विषयास पूरक व पोषक वातावरण मराठीमय असावे ही सूचना स्वागतार्ह आहे.

३.४.ग] <u>शिक्षक-विद्यार्थी - विद्यार्थी संबंध</u> -

विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीमधील तिस-या प्रश्नामध्ये द्वितीय भाषा मराठीच्या अध्ययन-अध्यापनाशी निगडीत असलेल्या काही बाबी दिलेल्या होत्या. मराठीचे अध्ययन, अध्यापन प्रभावी व्हावे या हेतूने शिक्षक - विद्यार्थी - विद्यार्थी संबंध या विशेष बाबीच्या संदर्भात सूचना कराव्यात असे सांगितले होते. विद्यार्थ्यांनी या संदर्भात केलेल्या

सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. शिक्षक विद्यार्थी संबंध मैत्रीपूर्ण असावेत.

२. शिक्षक सर्वांना समजून घेणारा असावा.

३. शिक्षक-विद्यार्थी - विद्यार्थी संबंध बंधू-भगिनी नात्याप्रमाणे असावेत.

४. शिक्षक-विद्यार्थी संबंध आई-मुलाप्रमाणे असावेत.

५. शिक्षक सर्व विद्यार्थ्यांकडे लक्ष देत नाहीत.

६. शिक्षक-विद्यार्थी संबंध दबावपूर्ण नसावेत.

७. शिक्षकांनी मराठी विषय शिकविताना मराठी भाषेचा वापर करावा.

या सूचनांमधून शिक्षक-विद्यार्थी - विद्यार्थी संबंध चांगले, मैत्रीचे, जिव्हाळ्याचे आणि आपुलकीचे असावेत असे सांगितले आहे. सूचना क्रमांक ४ मधून शिक्षक हा सहपालक आहे ही आधुनिक कल्पना किंवा पिता तु गुरू: । ही प्राचीन भारतीय कल्पना या कल्पना विद्यार्थ्यांना उघडपणे ज्ञात नसल्या तरी त्या कल्पनांचेच प्रतिबिंब या सूचनांमधून व्यक्त होते असे वाटते.

३.४.ह] <u>अवांतर वाचन, लेखन</u> -

द्वितीय भाषा म्हणून मराठी अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे या हेतूने भाषेच्या अवांतर वाचन-लेखन या संदर्भात कांही सूचना कराव्यात असे सांगितले होते. या संदर्भात विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थ्यांना वाचनासाठी वेगवेगळी पुस्तके असावीत.

२. विद्यार्थ्यांना कथा, कविता, लेख लिहिण्यास प्रवृत्त करावे.

३. अवांतर वाचनातून जीवनाशी निगडीत अशी माहिती मिळते.

४. क्रीडा, इतिहास, पौराणिक संदर्भात वाचन करावे.

५. छोटया कथा, निबंध, लेखनाच्या स्पर्धा घ्याव्यात.

६. क्रीडाविषयक, विज्ञानविषयक, जीवनचरित्र, कथा वाचनासाठी असाव्यात.

वरील सूचनांवरून विद्यार्थ्यांच्या ठिकाणी वाचन लेखनाची आवड

दिसून येते. त्यांना तसे पोषक वातावरण व साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे. त्यांच्या मनातील सुप्त भावनांना वाट मोकळी करून द्यावी असे वाटते.

३.५] मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन आणि अभ्यासपूरक कार्यक्रम :-

मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन मनोरंजक आणि प्रभावी व्हावे, तसेच भाषाविषयक दृष्टीकोनातून विशेषत: मराठीच्या संदर्भात विद्यार्थ्यां-मधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करण्यासाठी कोणते अभ्यासपूरक उपक्रम हाती घेता येतील हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक ४ ची योजना विद्यार्थी प्रश्नावलीत केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. या प्रश्नामध्ये मराठीचे अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे यादृष्टीने महत्वाच्या वाटणाऱ्या उपक्रमांना त्यांच्या महत्वाप्रमाणे एक ते दहा क्रमांक द्यावेत असे सांगितले. प्रस्तुत प्रश्नास विद्यार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ३.३ मध्ये संकलित केलेला आहे.

सारणी क्रमांक ३.३

मराठीचे अध्ययन-अध्यापन आणि अभ्यासपूरक कार्यक्रम - पसंतीक्रमांक व गुण

उपक्रमाचे नांव : १] हस्ताक्षर स्पर्धा [एकूण गुण ८०४]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | २४ | १८ | १३ | १८ | १२ | १२ | ४ | ४ | ३ | ६ |
| दिलेले गुण | २४० | १६२ | १०४ | १२६ | ७२ | ६० | १६ | १२ | ६ | ६ |

उपक्रमाचे नांव : २] निबंध स्पर्धा [एकूण गुण ७६४]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | २० | २२ | १७ | ११ | १६ | ३ | ३ | ३ | ८ | ५ |
| दिलेले गुण | २०० | १९८ | १३६ | ७७ | ९६ | १५ | १२ | ९ | १६ | ५ |

सारणी क्रमांक ३.३]-

उपक्रमाचे नांव : ३] प्रसिध्द साहित्यिकांच्या भेटी व व्याख्याने [एकूण गुण ६३८]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | १२ | २३ | ९ | ४ | ९ | १३ | ८ | ६ | १६ | १० |
| दिलेले गुण | १२० | २०७ | ७२ | २८ | ५४ | ६५ | ३२ | १८ | ३२ | १० |

उपक्रमाचे नांव : ४] कथा-कथन स्पर्धा [एकूण गुण ६३३]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | ११ | १३ | १९ | ८ | ७ | १५ | १४ | ७ | १ | २ |
| दिलेले गुण | ११० | ११७ | १५२ | ५६ | ४२ | ७५ | ५६ | २१ | २ | २ |

उपक्रमाचे नांव : ५] मराठी-इंग्रजी अनुवाद स्पर्धा [एकूण गुण ५७२]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | १५ | ८ | ११ | १० | ९ | ११ | ५ | ८ | १२ | १५ |
| दिलेले गुण | १५० | ७२ | ८८ | ७० | ५४ | ६६ | २० | २४ | ५५ | १५ |

उपक्रमाचे नांव : ६] नाट्यप्रवेश सादरीकरण [एकूण गुण ५५६]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | ३ | ८ | ७ | २० | ५ | १८ | १६ | १७ | १० | ३ |
| दिलेले गुण | ३० | ७२ | ५६ | १४० | ३० | ९० | ६४ | ५१ | २० | ३ |

उपक्रमाचे नांव : ७] मराठी वाङ्मय मंडळ स्थापना [एकूण गुण ५३७]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | १५ | ५ | ७ | ८ | १२ | ६ | ११ | १५ | १० | १९ |
| दिलेले गुण | १५० | ४५ | ५६ | ५६ | ७२ | ३० | ४४ | ४५ | २० | १९ |

सारणी क्रमांक ३.३]-

उपक्रमाचे नांव : ८] <u>अभिनय स्पर्धा</u> [एकूण गुण ५१४]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | ६ | २ | १० | ४ | २४ | १० | ११ | १८ | १२ | १२ |
| दिलेले गुण | ६० | १८ | ८० | २८ | १४४ | ५० | ४४ | ५४ | २४ | १२ |

उपक्रमाचे नांव : ९] <u>क्षेत्रभेटी</u> [एकूण गुण ४३८]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | २ | ७ | ६ | ४ | ९ | १३ | १० | १६ | २४ | २४ |
| दिलेले गुण | २० | ६३ | ४८ | २८ | ५४ | ६५ | ४० | ४८ | ४८ | २४ |

उपक्रमाचे नांव : १०] <u>दृक-श्राव्य साधनांचा वापर</u> [एकूण गुण ४१५]

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत संख्या | ४ | ७ | ६ | ८ | १२ | ६ | ९ | ५ | १६ | २३ |
| दिलेले गुण | ४० | ६३ | ४८ | ५६ | ७२ | ३० | ३६ | १५ | ३२ | २३ |

टीप : पसंती क्रमांकानुसार मतांचे गुणात रूपांतर कसे केले याची माहिती खालीलप्रमाणे.

| पसंती क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रत्येकी एका मतास दिलेले गुण | १० | ९ | ८ | ७ | ६ | ५ | ४ | ३ | २ | १ |

सारणी क्रमांक ३.३. मध्ये दिलेल्या उपक्रमांचा अनुक्रम लावण्यासाठी प्रथम पसंतीला १० गुण, द्वितीय पसंतीला ९ गुण, तृतीय पसंतीला आठ गुण, चतुर्थ पसंतीला ७ गुण, पाचव्या पसंतीला ६ गुण, सहाव्या पसंतीला ५ गुण, सातव्या पसंतीला ४ गुण, आठव्या पसंतीला ३ गुण, नवव्या पसंतीला २ गुण, दहाव्या पसंतीला १ गुण देऊन त्यांची बेरीज उपक्रमासमोर कंसात दिली आहे. त्यानुसार त्या उपक्रमांचे त्यांच्या पसंतीगुणानुसार पुढीलप्रमाणे क्रम असल्याचे

आढळून आले.

१] हस्ताक्षर स्पर्धा

२] निबंध स्पर्धा

३] प्रसिध्द साहित्यिकांच्या भेटी व व्याख्याने

४] कथा-कथन स्पर्धा

५] मराठी-इंग्रजी अनुवाद स्पर्धा

६] नाटयप्रवेश सादरीकरण

७] मराठी वाङ्‌मय मंडळाची स्थापना

८] अभिनय स्पर्धा

९] क्षेत्रभेटी

१०] दृक-श्राव्य साधनांचा वापर.

पसंतीच्या गुणानुसार लावलेल्या वरील उपक्रमानुसार विद्यार्थ्यांनी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित कराव्यात या उपक्रमाला प्रथम स्थान दिले आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी लेखनाचा सराव मराठी भाषेतील लेखनाच्या तुलनेने अधिक होतो. त्यामुळे इंग्रजी भाषेतील हस्ताक्षरा पेक्षा मराठीचे हस्ताक्षर सुधारावे असे वाटणे साहजिक आहे. हस्ताक्षर स्पर्धा ठेवल्यामुळे विद्यार्थी त्याचा सराव करतील. हस्ताक्षरासंबंधीची समस्या सोडविण्याच्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी या उपक्रमास प्रथम क्रमांक दिला असावा.

या उपक्रमानंतर पसंतीक्रमानुसार निबंध स्पर्धा या उपक्रमास द्वितीय क्रमांक दिलेला आहे. हाही उपक्रम विद्यार्थ्यांच्या विचार व कल्पनाशक्तीच्या विकासाच्यादृष्टीने महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून आपले विचार व्यक्त करण्याची इच्छा या उपक्रमाद्वारे पूर्ण करता येते. अशा स्पर्धातून विद्यार्थ्यांमधील सुप्त लेखक, साहित्यिक शोधण्यास शिक्षकासही मदत होणार आहे. त्यामुळे हा उपक्रम सर्वमान्य होण्यासारखाच आहे.

विद्यार्थ्यांनी पसंतीक्रमानुसार प्रसिध्द साहित्यिकांच्या भेटी व व्याख्याने उपक्रमास तिसरा क्रमांक दिलेला आहे. पाठ्यपुस्तकातील उतारे

व कविता यांना जन्म देणा-या लेखक-लेखिकांना व कवी-कवयित्रींना पाहण्याची भेटण्याची व त्यांचे विचार ऐकण्याची इच्छा असणे स्वाभाविकच आहे. कवी केशवसुतांच्या शब्दात सांगावयाचे झाले तर 'कवी तो होता तो कसा आननी' हे जाणून घेण्याची प्रबळ इच्छा असणे साहजिक आहे.

यानंतर दोन उपक्रम म्हणजे कथा-कथन स्पर्धा व मराठी-इंग्रजी अनुवाद स्पर्धा हे दोन्ही उपक्रम सर्वमान्य होण्यासारखेच आहेत. कारण इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेची अभिरूची निर्माण करण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमाची मदतच होईल. या नंतरच्या उपक्रमामधून विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील नाट्यप्रवेश, उता-यांचे सादरीकरण करण्याची, अभिनय करण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे. यातून इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी वाङ्मयाविषयीची आवड, सांस्कृतिक गुण विकसित करण्यास हातभारच लागेल.

यानंतरच्या पसंतीनुसार सुचविलेला उपक्रम म्हणजे मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना. हा उपक्रम इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावर [इयत्ता ९ वी, १० वी] राबविण्यास कांहीच हरकत नाही. अशा त-हेच्या मंडळाची स्थापना करून, विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्यावर जबाबदारी टाकून विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग मिळविता येईल. विद्यार्थ्यांनी ज्या विविध प्रकारच्या स्पर्धा ठेवाव्यात असे सुचविले आहे या प्रकारच्या स्पर्धा, त्याचे आयोजन, क्षेत्रभेटीचे नियोजन, साहित्यिकांच्या भेटीचे, व्याख्यानांचे कार्यक्रम संयोजन या वाङ्मय मंडळामार्फत विद्यार्थ्यांच्या सहकार्याने अधिक चांगल्या प्रकारे राबविता येईल.

विद्यार्थ्यांनी सर्वात कमी पसंती क्रमांक दर्शविलेला उपक्रम म्हणजे दृक-श्राव्य साधनांचा वापर. मराठी हा भाषाविषय असल्यामुळे दृक-श्राव्य साधनांच्या वापरास कांही मर्यादा पडतात. आणि शिकविणारा जर समर्थ अध्यापक असेल तर तो शब्दातूनच चित्र साकार करतो. असे म्हटले जाते की, कुशल अध्यापकाने शिकविलेली सुंदर कविता विद्यार्थ्यांच्या आनंदाचे चिरंतन

निधान होऊन राहते. म्हणून असे कुशल व समर्थ अध्यापक असल्यास अशा साधनांची आवश्यकता भासत नाही. म्हणून दृकश्राव्य साधनांच्या वापरास जी शेवटची पसंती दिलेली आहे त्याबद्दल आश्चर्य वाटत नाही.

३.६] विद्यार्थ्यांना मराठी विषय आवडण्याची व नावडण्याची कारणे :-

विद्यार्थी प्रश्नावलीमध्ये विद्यार्थ्यांना मराठी विषय आवडतो की आवडत नाही हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक पाचची योजना केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त व मुक्त अशा संमिश्र स्वरुपाचा होता. मराठी विषय आवडत असल्यास होय आणि आवडत नसल्यास नाही हा पर्याय ठेवावयाचा होता. प्रश्न क्रमांक पाचच्या "अ" विभागात 'होय' पर्याय असेल तर त्याची कारणे,"ब" विभागात 'नाही' पर्याय असेल तर त्याची कारणे दिलेली होती. त्या कारणावर योग्य तेथे ✓ अशी खूण करावयाची होती. या कारणा-व्यतिरिक्त आणखी काही कारणे असल्यास नमूद करण्यास सांगितली होती.

प्रस्तुत प्रश्नास विद्यार्थ्यांनी संमिश्र प्रतिसाद दिलेला आहे. म्हणजे कांही कारणांमुळे मराठी विषय आवडतो, तर कांही कारणांमुळे आवडत नाही असे नमूद केलेले आहे. त्यांनी दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ३.४ मध्ये नोंदविलेला आहे.

सारणी क्रमांक ३.४

मराठी विषयाची आवड - नावड

| अ. क्र. | प्रतिसाद | विद्यार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मराठी विषय आवडतो | ९९ | ४४.३९ |
| २ | मराठी विषय आवडत नाही | ८ | ३.५० |
| ३ | मराठी विषय काही कारणामुळे आवडतो आणि कांही कारणांमुळे आवडत नाही. | ११५ | ५१.५७ |
| ४ | प्रतिसाद न देणारे | १ | ०.४४ |
| | एकूण = | २२३ | १००.०० |

सारणी क्रमांक ३.४ नुसार असे दिसून येते की, मराठी विषय आवडतो आहे असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या ४४.३९ टक्के आहे. मराठी विषय आवडत नाही असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या ३.५९ टक्के आहे व संमिश्र प्रतिसाद देणा-या विद्यार्थ्यांची संख्या ५१.५७ टक्के आहे. अजिबात प्रतिसाद न देणा-यांची संख्या ०.४४ टक्के आहे. यावरून संमिश्र प्रतिसाद देणा-या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त असल्याचे दिसून येते.

प्रश्न क्रमांक ५ च्या अ आणि ब विभागात अनुक्रमे मराठी विषय आवडण्याची व नावडण्याची कारणे दिलेली होती. योग्य कारणापुढे ✓ अशी खूण करावयास सांगितले होते. त्यानुसार मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण पुढील सारणीमध्ये दिलेले आहे.

सारणी क्रमांक ३.४ वरून असे दिसून येते की, मराठी विषय आवडतो असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या ४४.३९ टक्के आहे. प्रश्न क्रमांक ५ -अ विभागामध्ये मराठी विषय आवडत असल्यास त्याची कारणे दिलेली होती. योग्य कारणावर ✓ खूण करावयाची होती. या विभागास दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ३.५ मध्ये दिलेले आहे.

<u>सारणी क्रमांक ३.५</u>

<u>मराठी विषय आवडणेची कारणे</u> [९९ विद्यार्थ्यांपैकी]

| अ. क्र. | कारणे | विद्यार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सोपा विषय म्हणून | ६० | ६०.६० |
| २ | मातृभाषा आहे म्हणून | ६७ | ६७.६० |
| ३ | प्रादेशिक भाषा आहे म्हणून | ६१ | ६१.६० |
| ४ | व्यवहाराचे माध्यम आहे म्हणून | ६० | ६०.६० |
| ५ | पाठ्यपुस्तक मनोरंजक आहे म्हणून | ३२ | ३२.३२ |
| ६ | व्याकरण सुलभ वाटते म्हणून | ५० | ५०.५० |

सारणी क्रमांक ३.५]-

| अ. क्र. | कारणे | विद्यार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ७. | मराठीचे शिक्षक चांगले आहेत म्हणून | ६० | ६०.६० |
| ८ | मराठीचे शिक्षकांचे अध्यापन चांगले आहे म्हणून | ६० | ६०.६० |
| ९ | राजभाषा म्हणून | ४३ | ४३.४३ |
| १० | अवांतर वाचनास भरपूर साहित्य आहे म्हणून | ४१ | ४१.४१. |

सारणी क्रमांक ३.५ वरून असे निदर्शनास येते की,

१] मातृभाषा आहे म्हणून मराठी विषय आवडतो असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त आहे. शाळा इंग्रजी माध्यमाच्या असल्या तरी सुध्दा या शाळेमध्ये जाणा-या विद्यार्थ्यांमध्ये बहुतांशी विद्यार्थी महाराष्ट्रातील असल्याने त्यांची घरी मातृभाषा मराठी आहे म्हणून त्यांना या विषयाची आवड असावी.

२] सोपा विषय आहे म्हणून, प्रादेशिक भाषा आहे म्हणून, व्यवहाराचे माध्यम आहे म्हणून, मराठीचे शिक्षक चांगले आहेत म्हणून, मराठीचे शिक्षकांचे अध्यापन चांगले आहे म्हणून मराठी विषय आवडतो असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या सारखीच आहे. म्हणजे वरील चारही कारणामुळे मराठी विषय आवडणा-यांची संख्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रामुख्याने दिसून येते.

३] पाठ्यपुस्तक मनोरंजक आहे म्हणून, राजभाषा आहे म्हणून, व्याकरण सुलभ वाटते म्हणून, अवांतर वाचनास सुलभ भरपूर साहित्य आहे म्हणून मराठी विषय आवडतो असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या ५०%पेक्षा कमी आहे.

वरील कारणांव्यतिरिक्त कांही कारणे असल्यास नमूद करावी असे सांगितले होते. पण या मुक्त प्रश्नास अत्यल्प प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी

दिलेल्या प्रतिसादामध्ये पुढील कारणांचा समावेश आहे.

१. सभोवतालच्या परिसरात मराठी भाषेचा वापर जास्त आहे म्हणून.
२. एकदा वाचल्याने समजते व लक्षात राहते म्हणून.
३. पालकांचे या विषयामध्ये मार्गदर्शन मिळते म्हणून.

प्रश्न क्रमांक ५ च्या ब विभागामध्ये मराठी विषय आवडत नसल्यास त्याची कारणे दिलेली होती. योग्य तेथे ✓ अशी खूण करावयास सांगितले होते. मराठी विषय आवडत नाही असे म्हणणाऱ्या विद्यार्थीवर्गाची संख्या केवळ ३.५९ टक्के आहे. सदर प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे सारणी क्रमांक ३.६ मध्ये वर्गीकरण केलेले आहे.

<u>सारणी क्रमांक ३.६</u>

<u>मराठी विषय न आवडण्याची कारणे</u>

[८ विद्यार्थ्यांपैकी]

| अ. क्र. | कारणे | विद्यार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मातृभाषा नाही म्हणून | ६ | ७५.० |
| २ | भाषेस दुय्यम स्थान आहे म्हणून | ४ | ५०.० |
| ३ | व्याकरण अवघड आहे म्हणून | ७ | ८७.५ |
| ४ | पाठ्यपुस्तक केवळ माहितीपूर्ण आहे | २ | २५.० |
| ५ | शिक्षकांचे अध्यापन चांगले नाही | १ | १२.५ |
| ६ | इंग्रजीतून स्पष्टीकरणे दिली जातात | १ | १२.५ |
| ७ | शुध्दलेखनाच्या चुका होतात | ८ | १०० |
| ८ | उच्चशिक्षणासाठी उपयुक्त नाही | २ | २५.० |
| ९ | अर्थछटा लक्कर आकलन होत नाहीत | ७ | ८७.५ |
| १० | अवांतर वाचनाची संधी मिळत नाही | ३ | ३७.५ |

वरील सारणी क्रमांक ३.६ वरून असे दिसून आले की, शुध्दलेखनाच्या चुका होतात, व्याकरण अवघड आहे व अर्थछटा लवकर लक्षात येत नाही या

कारणामुळे मराठी विषय आवडत नाही असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे व इतर कारणाबाबत सहमत होणा-या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे.

एकंदरीत मराठी विषय आवडत नाही असे म्हणणा-यांची संख्या केवळ ३.५९ टक्के आहे, ही विचारात न घेण्याइतकी अल्प आहे.

प्रश्न क्रमांक ५ मध्ये मराठी विषय आवडतो व आवडत नाही असा संमिश्र प्रतिसाद देणा-या विद्यार्थ्यांची संख्या ५१.५७ टक्के आहे. यावरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांना काही कारणामुळे मराठी विषय आवडतो, तर कांही कारणामुळे आवडत नाही. त्यांनी दिलेल्या संमिश्र प्रतिसादाचे वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ३.७ मध्ये नोंदविलेले आहे.

<u>सारणी क्रमांक ३.७</u>

<u>संमिश्र प्रतिसाद देणा-या विद्यार्थ्यांची कारणे</u>

[११५ विद्यार्थ्यांपैकी]

[३.७.अ मराठी विषय आवडण्याची कारणे]

| अ. नं. | मराठी विषय आवडण्याची कारणे | विद्यार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सोपा विषय म्हणून | ७८ | ६७.८ |
| २ | मातृभाषा आहे म्हणून | ७५ | ६५.२ |
| ३ | प्रादेशिक भाषा आहे | ४८ | ४१.७ |
| ४ | व्यवहाराचे माध्यम म्हणून | ५८ | ५०.४ |
| ५ | पाठ्यपुस्तक मनोरंजक आहे. | ७९ | ६८.६ |
| ६ | व्याकरण सुलभ वाटते | ३९ | ३३.९ |
| ७ | मराठीचे शिक्षक चांगले आहेत | ७४ | ६४.३ |
| ८ | मराठीचे शिक्षकांचे अध्यापन चांगले आहे म्हणून | ८५ | ७३.०९ |
| ९ | राजभाषा आहे म्हणून | ३० | २६.०८ |
| १० | अवांतर वाचनास भरपूर साहित्य आहे म्हणून | ३९ | ३३.९ |

सारणी क्रमांक ३.७.ब]- मराठी विषय न आवडण्याची कारणे
[११५ विद्यार्थ्यांपैकी]

| अ. नं. | मराठी विषय न आवडण्याची कारणे | विद्यार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मातृभाषा नाही म्हणून | १६ | १३.९ |
| २ | भाषेस दुय्यम स्थान आहे | १९ | १६.५ |
| ३ | व्याकरण अवघड आहे | ५० | ४३.४ |
| ४ | पाठ्यपुस्तक केवळ माहितीपूर्ण | २१ | १८.२ |
| ५ | शिक्षकांचे अध्यापन चांगले नाही | ४ | ३.४ |
| ६ | इंग्रजीतून स्पष्टीकरणे दिली जातात | १० | ८.६ |
| ७ | शुध्दलेखनाच्या चुका होतात | ७५ | ६५.२ |
| ८ | उच्च शिक्षणासाठी उपयुक्त नाही म्हणून | ५१ | ४४.३ |
| ९ | अर्थछटा लवकर आकलन होत नाही | ६४ | ५५.६ |
| १० | अवांतर वाचनाची संधी मिळत नाही | ३४ | २९.५ |

सारणी क्रमांक ३.७ वरून असे निदर्शनास येते की, मराठीचे शिक्षकांचे अध्यापन चांगले आहे, मराठीचे शिक्षक चांगले आहेत, पाठ्यपुस्तक मनोरंजक आहे, सोपा विषय आहे म्हणून, मातृभाषा आहे म्हणून या कारणामुळे मराठी विषय आवडतो असे प्रामुख्याने प्रतिसादात दिसून येते. कारण वरील कारणामुळे अशी खूण करणा-या विद्यार्थ्यांची संख्या ७५ च्या पुढे आहे.

तर मराठी विषय न आवडण्याची कारणे प्रामुख्याने पुढील दिसून येतात. शुध्दलेखनाच्या चुका होतात, अर्थछटा लवकर आकलन होत नाही, उच्च शिक्षणासाठी उपयुक्त नाही, व्याकरण अवघड आहे अशी कारणे प्रामुख्याने दिसून येतात.

या व्यतिरिक्त कांही कारणे असल्यास ती नमूद करण्यास सांगितली होती. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मराठी विषय न आवडण्यासंबंधी मराठीच्या पाठ्यपुस्तकात विज्ञानकथा नाहीत व शास्त्रज्ञांची चरित्रे नाहीत ही कारणे

नमूद केलेली आहेत.

३.७] <u>समारोप</u> :-

माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या समस्या जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीला विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असून त्याचा अन्वयार्थ लावलेला आहे. या अन्वयार्थावर आधारित निष्कर्ष काढून त्यावरील शिफारशींचे संकलन प्रकरण पाच मध्ये केलेले आहे.

पुढील प्रकरण क्रमांक चार मध्ये माध्यमिक स्तरावरील इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये मराठी विषयाच्या अध्यापनविषयक समस्यांचे विश्लेषण व विवरण केले असून अन्वयार्थ लावलेला आहे.

—****—